# ग्रीनलॉन्स विद्यालय

| | | |
|---|---|---|
| | **विषय-मराठी** | **वेळ -२ तास** |
| **इयत्ता- ५-अ,ब,क.** | **प्रथम सत्रांत परीक्षा** | **एकूण गुण - ३५** |

**विभाग -अ**

प्र.१ ला अ) रिकाम्या जागा भरा. [४]

१. कोंबडी -----------जाऊन बसली.

२. तो -------------आईसाठी चहा करत होता.

३. हळूहळू तिला पावसावरच्या ------------आठवू लागल्या.

४. बाहेर ---------ऊन पडलेले होते.

आ) कोण कोणास म्हणाले ते लिहा. [४]

१. " ही पिसं कोणाची आहेत,हे तुला माहीत आहे का?"

२. " तू काय करतोस?"

३. "ही तर बदकाची आहेत."

४. "हे माझा लक्षातच आले नाही."

इ)खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा. [४]

१. कवी मोराला कशाखाली नाचण्यास सांगत आहे?

२. कबुतर कोणत्या रंगाचे होते?

३. कोणाची आई आजारी होती?

४. उन्हाने ग्रासल्यावर सगळेजण आतुरतेने कशाची वाट पाहतात?

ई) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [४]

१. इंद्रधनुष्यातील सात रंग कोणते?

२. मिनू कोणाकोणाला भेटली?

३. फातिमाने कशासाठी नकार दिला?

४. मारिया आईला का बिलगली?

प्र.२ रा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (**कोणतेही तीन**) [६]

१. बदक मिनूला काय म्हणाले?

२. फातिमाने दिनूला इंधनाची बचत कशी करायला सांगितली?

३. पावसाळ्यात तुम्ही आरोग्याविषयी कोणती काळजी घेता?

४. कवीने पावसाळ्यातील वातावरणाचे वर्णन कसे केले आहे?

प्र.३ रा खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. [८]

१. पावसाळ्यातील एक दिवस २. माझी शाळा ३. माझे आवडते फळ

प्र.४था खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. [ ५]

एकदा देवाने सर्व प्राण्यांना स्वर्गात मेजवानीला बोलावले. सर्व प्राणी हजर झाले. फक्त कासव तेवढे गेले नाही. दुसऱ्या दिवशी देवाने

कासवाला विचारले.

"काल सगळ्यांबरोबर तू का नाही आलास?"

"घरासारखं दुसरं चांगलं ठिकाण नाही." कासवाने उत्तर दिले.

'असं काय?' रागाने देव म्हणाला, "मग आता आजपासून तुला आपले घर आपल्या पाठीवरच वागवावे लागेल."

"कित्येकांना दुसरीकडच्या मेजवानीपेक्षा घरची मीठभाकरच पसंत असते."

प्रश्न :-

१. सर्व प्राणी स्वर्गात का हजर झाले?

२. देवाच्या स्वर्गातील मेजवानीला कोण गेले नाही?

३. देवाने कासवाला काय विचारले?

४. कासवाने देवाला काय उत्तर दिले?

५. देव रागावून कासवाला काय म्हणाला?